# Interdisciplinary International Conference contemporary Issues & Challenges in Social Sciences & Languages

22nd Sept.2018

## Organizer

**Deparitment of Political Science,**

**Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur**

## Special Issue published By


Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

**ISSN 2349-638x**

**Peer Review and Indexed Journal**

**Impact Factor 4.574**

**Website www.aiirjournal.com**

**mail :- aiirjpramod@gmail.com**

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 216 | कृष्णात पांडूरंग पाटील | ग्रंथालय व माहितीशास्त्र क्षेत्रातील आव्हाने | 796 To 799 |
| 217 | प्रा. डॉ. एस. के. खडसे मुस्तफा अल्लाउद्दीन शेख, आसमा आयूब जमादार, अभिमन्यू विजय मधाळ | तीन तलाक एक अभ्यास | 800 To 804 |
| 218 | नागेश मधुकर महाडीक | विश्वबंधुत्व आणि भारत | 805 To 809 |
| 219 | प्रा. डॉ. निरंजन कौर सरदार | सामाजिक शास्त्रातील संशोधन समस्या आणि उपाय | 810 To 813 |
| 220 | डॉ. नितीन गायकवाड | जागतिक राजकारणातील नवा संदर्भ : पर्यावरण राजकारण | 814 To 816 |
| 221 | डॉ. परमेश्वर अभंगराव पाटील | सामाजिकशास्त्रे अध्यापनातील आव्हाने व शिक्षकांची भूमिका | 817 To 819 |
| 222 | पूजा शर्मा | इतिहास का अध्ययन एवं सूचना प्रौद्योगिकी : चुनौतियाँ एवं उपादान | 820 To 822 |
| 223 | डॉ.सौ.प्रमिला विजय डोणे-पाटील | आर्थिक विकासाचे नवे इंजिन - 'स्मार्ट सिटी' | 823 To 826 |
| 224 | डॉ. सौ. सुजाता चंद्रकांत पंडित. | जागतिकीकरण व मूल्यशिक्षण आवश्यकता | 827 To 828 |
| 225 | डॉ. शर्मिला घाटगे | तौलनिक साहित्य अभ्यास आणि भाषांतरातील प्रश्न | 829 To 832 |
| 226 | डॉ. शहाजीराव धोंडीराम वारके | ग्रामविकास आव्हाने आणि संधी | 833 To 834 |
| 227 | रावसाहेब सटवा कांबळे | भारतातील सांप्रदायिकवाद आणि भारतीय राजकारण | 835 To 837 |
| 228 | सागरकुमार विठ्ठल जाधव | जागतिकीकरण व राज्याचे सार्वभौमत्वाचा प्रश्न | 838 To 840 |
| 229 | संदीप शिवलिंग गाडे | बिग ब्रदर : भारत | 841 To 843 |
| 230 | डॉ.संजय हिंदूराव शिंदे | साइबर गुन्हेगारी एक आव्हानात्म क सामाजिक सम स्या | 844 To 849 |
| 231 | डॉ. सुनिल साळुंके मुबीन शेख | तत्वज्ञानाचा इतर सामाजिक शास्त्राशी संबंध | 850 To 853 |
| 232 | शितल चंद्रकांत पाटील | निर्वासित रोहींग्या मुस्लीम भारतासमोरील एक समस्या | 854 To 856 |
| 233 | डॉ. शिवाजी सुबराव पाटील | ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या शिक्षणविषयक विचारांची प्रस्तुतता | 857 To 860 |
| 234 | शोभा संग्राम पाटील | शिक्षक प्रशिक्षणात TCT चा उपयोग | 861 To 862 |
| 235 | डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले. | भारतीय स्त्रियांसमोरीलसमस्या : इतिहास आणि वर्तमान | 863 To 866 |

# तत्वज्ञानाचा इतर सामाजिक शास्त्राशी संबंध

**डॉ. सुनिल साळुंके**
तत्वज्ञान विभाग प्रमुख
दयानंद कला महा. लातूर

**मुबीन शेख**
संशोधक विद्यार्थी
जयक्रांती कला, वाणिज्य वरिष्ठ महा. लातूर

**प्रस्तावना:**

प्रसिध्द पाश्चात्य तत्वचिंतक प्लेटो आपल्या जगप्रसिध्द 'रिपब्लीक' या ग्रंथात असे म्हणतो की, तत्वज्ञ राजा असावा तर काही विचारवंतानी तत्वज्ञानाला विषयांचा राजा—*Philosophy is the king of all subject* असे म्हटले आहे. या विधानावरून मानवी जीवनातील तत्वज्ञानाचे महत्त्व स्पष्ट होते. तसे पाहता तत्त्वज्ञानाचा जन्म मानवी जिज्ञासेतून झाला आहे. जीज्ञासा हे तत्त्वज्ञानाचे निर्मिती क्षेत्र आहे. मनुष्य जेंव्हा जन्माला येतो तेव्हा तो सभोवतालच्या जगाला मी कोण आहे? असा प्रश्न विचारतो. शेवटपर्यंत या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतो. यातूनच तत्वज्ञानाचा उगम होतो. तत्त्वज्ञान म्हणजे ज्ञानाची ओढ. मानव आपली जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी सतत अनुभवांचा शोध घेत असतो. हा अनुभव संपूर्ण मानवी जीवन व्यापून टाकतो. हीच गोष्ट इतर सामाजिक शास्त्रांना लागू पडते.

मनुष्य जसा बुध्दीमान आहे. तसाच तो कृतीशील आहे. मानवेतर प्राण्यात याच गोष्टीचा अभाव आहे. मानवाचे जीवन हे कृतीने व्यापलेले आहे. जीवन जगताना त्याला केवळ विचार करून चालत नाही. तर विचारासोबत कृती करावी लागते. फरक एवढाच की, मनुष्य आधी विचार करतो व नंतर कृती करतो. ज्याप्रमाणे विजेचा प्रकाश अगोदर दिसतो. व आवाज नंतर येतो. तसेच मानवाची कृती घडत असते. हे प्रत्येकालाच लागू होते. मग तो राष्ट्रपती असो वा साधा कारकुन असो. याबाबत भेदभावा नाही. म्हणजे कृती करण्या अगोदर तो विचार करतो. उदा. व्यक्ती जेव्हा एखादी वस्तु खरेदी करण्याचे ठरवतो. तेव्हा तो त्या वस्तू विषयी सारासार विचार करतो. मी कोणत्या कंपनीची वस्तू घ्यावी? ती वस्तू टिकावू स्वरूपाची आहे का? यासंदर्भात तो कधीकधी इतरांचा सल्ला घेतो. व नंतर वस्तू खरेदी करतो. म्हणजे एखादी वस्तू खरेदी करताना इतक्या प्रक्रियेतून जावे लागते. फरक एवढाच की, कोणाला याची जाणीव असते तर कोणाला याची जाणीव नसते. म्हणून प्रत्येक व्यक्तीचे तत्त्वज्ञान वेगळे असते. तत्त्वज्ञान हा विषय कोणाला ही टाळता येत नाही.

**तत्त्वज्ञानाचे स्वरूप:**

विविध तत्वचिंतकांनी तत्त्वज्ञानाच्या विविध व्याख्या केल्या आहेत. त्यातील काही प्रमुख व्याख्यांचा आढावा घेतला आहे. त्या व्याख्यांच्या अर्थावरून तत्त्वज्ञानाचे नेमके स्वरूप लक्षात येईल.

१) ''तत्त्वज्ञान ही सर्व शास्त्रांची जननी आहे.''—आजच्या काळात वैज्ञानिक सत्य म्हणून मान्यता पावलेली अनेक सत्ये ही सुरूवातीचे तात्वीक प्रश्न होते. या प्रश्नांची योग्य उत्तरे मिळताच त्यांचा समावेश विज्ञानाच्या प्रांतात केला गेला. म्हणूनच 'तत्त्वज्ञान म्हणजे सर्व शास्त्राची जननी' अशी व्याख्या केली जाते.

२) ''तत्वज्ञान परिचीत वस्तूंमधील अपरिचीत बाजू दाखवून आपली जिज्ञासाची जाणीव जीवंत ठेवते''.— प्रसिध्द तत्त्वचिंतक रसेल यांनी ही व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, मानवी मनाच्या जिज्ञासू वृत्तीतून तत्वचिंतनाचा उगम होते. सभोवतालचे जग आणि स्वत:विषयी वाटणाऱ्या कुतुहल, विस्मय, आश्चर्यभावनेतून सुरूवात होते. व या आश्चर्यभावनेतूनच ज्ञानाची निर्मिती होते.

अशा प्रकारे तत्वज्ञान व सामाजिक शास्त्रांचा तौलनिक अभ्यास करून त्यातील संबंध स्पष्ट करता येतो. याशिवाय संरक्षणशास्त्र, इतिहास, ग्रंथालयशास्त्र अशा इतर ही सामाजिक शास्त्रांचा तत्वज्ञानाशी संबंध नाकारता येत नाही.

**निष्कर्ष:**

तत्त्वज्ञान म्हणजे सुसंगतपणे अभ्यास करण्याची पध्दती होय. याचा अर्थ असा होतो की, तत्त्वज्ञान एखाद्या गोष्टींचा सुसंगत, निरंतर व शिस्तबध्द पध्दतीने विचार करते. कोणत्याही गोष्टीचे अंतिम स्वरूप आपल्यासमोर मांडते. यावरून हे स्पष्ट होते की, सुसंगतपणे विचार करणे, ही प्रत्येक सामाजिकशास्त्राची मुख्य अट आहे. तत्वज्ञान वैश्वीक, नैतिक, मुल्याबाबत व्यक्तींची संवेदनशीलता वृध्दींगत करून विश्वशांती, सुसंवाद, न्याय, आणि प्रामाणिक पणाच्या तत्वांची कास धरण्यास प्रेरित करतो. या अर्थाने तत्वाज्ञानास व्यवहारीक मुल्य आहे. कारण त्यातील प्रश्न आपले अस्तित्व आणि इतरांशी असलेल्या अापल्या संबंधाशी निगडीत असतात. तसेच तत्वज्ञानात नैतिक व सामाजिक मुल्यांचे परिक्षण केले जाते. ही मुल्य मानवी समाजाचा कणा असतात. मुल्यांना वगळून मानवी समाजाची कल्पना करणे अशक्य आहे. तत्वज्ञान आपल्याला कोणतेही पूर्वग्रह न बाळगता मोकळ्या मनाने विचार करायला प्रवृत करते. यातून विचार व्यापक बनतात. हे व्यापक विचार सामाजिक शास्त्रांच्या सिध्दांत निर्मितीसाठी साहयक ठरतात.

तत्वज्ञानात ज्या गोष्टींचा अभ्यास केला जातो. त्याचा एकतर्फी विचार नकरता त्या गोष्टींचा सर्व बाजूने सखोल विचार केला जातो. एखाद्या गोष्टीचा सखोल अभ्यास केल्याशिवाय सुक्ष्म चिंतन केल्याशिवाय त्याच्या मुळापर्यंत जाता येत नाही.हेच तत्त्व इतर सामाजिकशास्त्रांना लागू पडते. कारण सखोल चिंतन केल्याशिवाय निर्दोष सिध्दांत निर्मिती शक्य होत नाही. तत्वज्ञान एक विचार तर आहेच परंतु कृती देखील आहे. म्हणजेच तत्वज्ञान मानवाला कार्यकरण्याची प्रेरणा देते. तत्वज्ञानाचे कार्यक्षेत्र व्यापक आहे. ते अस्तित्वात असणाऱ्या व अस्तित्वात नसाणाऱ्या गोष्टींचाही अभ्यास करते. तत्वज्ञानाला स्वतंत्र अभ्यास विषय नाही. तो विषयांचा राजा आहे. त्यात सर्वविषयांचा अभ्यास केला जातो.

**संदर्भग्रंथ:**

१)श्रीनिवास दिक्षीत– भारतीय तत्वज्ञान, फडके प्रकाशन कोल्हापूर, सहावी आवृत्ती १९९६.
२) तत्त्वज्ञान, इयत्ता १२ वी.
३) निगम शोभा– भारतीय दर्शन, मोतीलाल बनारसीदास प्रकाशन दिल्ली, तृतीय संस्करण .
४) नरेश प्रसाद तिवारी– भारतीय दर्शन, एवं पाश्चात्य दर्शन,मोतीलाल बनारसीदास प्रकाशन दिल्ली, द्वितीय संस्करण २००८.
५) नंद किशोर देवराज– भारतीय दर्शन, उत्तर प्रदेश हिंदी संस्थान लखनऊ, तृतीय संस्करण १९८३.
६) सवदी अरूण/कोळेकर पांडूरंग– आपले पर्यावरण.